# वसई-विरार शहर महानगरपालिका

## घनकचरा वर्गीकरण करणेबाबत आवाहन

### घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ अन्वये

**कचरा निर्मितीच्या जागी (Onsite) कचरा निर्माते (Waste generators) द्वारे घनकचऱ्याचे वर्गीकरण करणे बंधनकारक आहे.**

#### ओला कचरा / Wet Waste

- खराब अन्न, चहापत्ती, फळे- भाज्या, मांस-हाड, अंड्याचे कवच इत्यादी
- बागेतील गवत, पालापाचोळा, फूल इत्यादी.
- सोसायटीमधील नारळाच्या झावळ्या, खोड इत्यादी

#### सुका कचरा / Dry Waste

- वृत्तपत्र
- पेपर- रद्दी
- धातूचे वस्तू, वायर
- रबर
- सर्व प्रकारचे प्लास्टिक
- कापडी चिंध्या
- लेदर, रेगझीन
- वूड फर्निचर
- पॅकेजींग मटेरियल
- काचेचे वस्तू

#### सॅनेटरी कचरा SANITARY WASTE

- सॅनिटरी नॅपकिन
- डायपर

#### विशेष दक्षता घेणेयोग्य कचरा/ Special Care waste

- सर्व प्रकारचे स्प्रे बॉटल्स
- बॅटरी
- ब्लीचिंग, फेनोल इत्यादी कंटेनर
- कार बॅटरी, ऑईल फिल्टर्स, कार केयर प्रोडक्ट
- केमिकल्स, सॉल्वेंट इत्यादी कंटेनर
- पेंट, ऑईल, लूनीकेंट, ग्लू, थिनर इत्यादी केमिकल व कंटेनर
- स्टायरोफोक आणि सॉफ्ट फोम पॅकेजी मटेरियल
- फुटलेले थर्मामिटर व मर्क्युरी असलेले इत्यादी प्रोडक्ट
- कालबाह्य औषधे, डिस्पोझेबल सिरिंज



## कचऱ्याचे वर्गीकरण करणे का आवश्यक आहे ?

- **प्रभावी पुर्नवापर -** सुका कचरा पुनर्वापरात येतो तर, ओला कचरा कंपोस्ट व बायोगॅस निर्मितीसाठी उपयुक्त ठरतो.
- **क्षेपणभूमीवरील भार घटतो-** कचरा वेगळा केल्यास जागा वाचते, कचऱ्यावर प्रक्रिया करणे सुलभ होते व पर्यावरणीय ऱ्हास कमी होतो.
- **नैसर्गिक संसाधनाचे संरक्षण-** विलगीकरणामुळे नैसर्गिक संसाधनाची बचत होते.
- **उर्जा निर्मिती-** ओला कचऱ्यापासून बायोगॅस तयार होऊन उर्जा निर्मितीची गरज भागते व सुक्या कचऱ्यापासून High calorific इंधन/ ऊर्जा निर्माण करण्यास मदत होते.

## आवाहन

वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत आवाहन करणेत येते की, "घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०२६" अन्वये प्रत्येक कचरा निर्मात्याने (नागरीकांनी) विघटनशील (कुजणारा किंवा ओला) कचरा, अविघटनशील (न कुजणारा किंवा सुका) कचरा, विशेष दक्षता घेणेयोग्य कचरा व सॅनिटरी कचरा या चार प्रकारच्या कचऱ्याचे वर्गीकरण करणे बंधनकारक आहे.

सदर कचरा वर्गीकृत पद्धतीत न दिल्यास घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ व २०२६ अंतर्गत महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २२८ ते २३२ नुसार सार्वजनिक स्वच्छता उपद्रव नियंत्रणासाठी प्रशासकीय शुल्क (दंड) रू. १००/- प्रती व्यक्तीस आकरण्यात येईल.

सदर दंड **'१ जून २०२६'** पासून लागु करण्यात येईल याची नागरीकांनी कृपया नोंद घ्यावी.